# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/12/2022 (गुरूवार) सकाळ

---

## खून

**पो.स्टे. कोंढाळी :-** अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा बाजारगाव बसस्टॅड जवळील बांबुचे बनात येथे दिनांक २८/१२/२०२२ चे १७.०० वा. पुर्वी यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने कोणतेतरी अज्ञात कारणावरून मृतक नामे- भरतराव आनंदराव वरवाडे, वय ३७ वर्षे रा. सिंदेवाही जि. चंद्रपुर, ह. मु. बाजारगाव यास बाजारगाव बसस्टॅड जवळ असलेल्या बांबुच्या बनात कशानेतरी डोक्यावर वार करून जखमी करून जिवे ठार मारले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- श्री. लिलाधर सदबाजी बोरसरे, वय ४८ वर्ष, रा. कुंभारपुरा बाजारगाव ता. जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे ठाणेदार पोस्टे. कोंढाळी हे मो. क्र. ७३०४२१०७२२४ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. सावनेर :-** दिनांक ०८/०६/२०२२ चे १३.०० वा. ते दिनांक २८/१२/२०२२ चे १०.१५ वा. दरम्यान आरोपी नामे- प्रेम सुधाकर राऊत, वय २२ वर्ष, रा. वार्ड २ सावनेर ता. सावनेर हा पीडीता फिर्यादी हिचा जुन २०२२ पासून फिर्यादी पिडीत मुलगी ही शाळेत तसेच टयुशन क्लास ला जात असता तिचा पाठलाग करुन तिच्यासोबत बोलण्याचा प्रयत्न करीत होता. फिर्यादीचे पाठलाग करण्याबाबत हटकले असता तरी आरोपी हा फिर्यादीला पाठलाग करायचा. दि. २८/१२/२०२२ रोजी १०.१५ वा. दरम्यान फिर्यादी ही टयुशन क्लास वरुन मित्रा सोबत घरी पायदळ जात असता आरोपी तिच्या पाठीमागून आला व म्हणाला की, ‘‘मी तुझावर मनापासून प्रेम करतो मी तुझ्या सोबत बोलण्याचा प्रयत्न करतो परंतु तु माझ्याशी का बोलत नाही? मी तूला माझ्याशिवाय दुसऱ्याची होवू देणार नाही’’ असे म्हणुन फिर्यादीचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द ३५४, ३५४ (ड) भादवी सहकलम १२, बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रियंका गेडाम पो.स्टे कळमेश्वर मो. क्र. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**